ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-6 No. 16 June 2020

# राष्ट्रसंताच्या विचारातील दारूबंदी

**प्रा. डॉ. प्रवीण कारंजकर**
श्री. साईबाबा लोप्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर, जि. वर्धा.

**सारांश**
मद्यपान ही आपली राष्ट्रीय समस्या बनली आहे. देशातील प्रत्येक भागात मद्यालये आणि मद्यपी बहुसंख्येने दिसून येतात. सरकारी परवाने असणारे मद्यालये व परवाना धारक मद्यापीही आहेत. या सर्व मुळेच अलीकडेच महाराष्ट्राला मद्यराष्ट्र असेही बाबा आमटेचे पुत्र डॉ. प्रकाश आमटेंनी म्हटले होते. यावरूनही आपल्या भागातील दारूचे वाढते प्रमाण लक्षात येते.
**शब्द सूची** शराबीखाने, राष्ट्रसंत

## प्रकरणाची ओळख

दारूच्या या व्यसनावर अनेकांनी कठोर शब्दात टिका केलेली दिसते. धार्मिक ग्रंथही दारूचा निषेधच करतात. सर्वच महापुरुषांनी व्यसनांना नाकारले होते त्यात, दारूचाही समावेश होतो. महात्मा गांधी तर म्हणतात, "अगर मुझे एक घंटे के लिए भारत का तानाशाह बना दिया जाऐ, तो पहला काम मै यह करूंगा की तमाम शराबीखाने को मुआवजा दिऐ बिनाही बन्द करा दुँगा।" (१) महात्मा गांधी दारूला शरीर व आत्म्याचा नाश करणारे व्यसन मानत होते. गांधीजी व्यथित होऊन म्हणत आमच्यासाठी ही बाब अतिशय लाजीरवाणी आहे. की जे शिक्षण आम्ही आमचे मुले घेतात. हे त्या शिक्षणाचा सर्व दारू विक्री च्या रूपाने मिळणा–या पैशातून होत असतो. अशाप्रकारे गांधीजींनी दारूचा सर्वच बाजुंनी निषेध केलेला दिसतो.

## दारूबंदी

गुरूदेव प्रकाशने प्रकाशित केलेल्या दारूबंदी या पुस्तिकेत दारूच्या व्यसनांचे दुष्परिणाम संगण्यासाठी विविध पाश्चात्य विचारवंताची मते दिलेली आहे. या पुस्तिकेच्या पृष्ठ ६२ वर डॉ. बौमोट म्हणतात, "दारूमुळे कोठयांत गुंगी व आवेश उत्पन्न होऊन पुढे पुढे पचनक्रीया मंदावते. पोटातील पाचक रस उत्पन्न करणारी पिशवी अगदी निकामी होते. ज्ञानतंतु लटके पटल्याने हे दुष्परिणाम प्रथम कळत मात्र नाहीत."(२) याच पुस्तिकेत पृष्ठ ६३ वरती मि. कोलीलियम म्हणतात, "हृदय, फुफ्फसे व कोठा यांची दारूने अत्यंत नासाडी होऊन अनेक भयंकर असे रोग उत्पन्न होतात. दारूमुळे होणारा क्षय कोणत्याही औषधाने बरा होत नाही. वेड हा दारूचा आवडता रोग पिढयानपिढया भोगावा लागतो."(३) या सर्वांतून आपणास हेच कळते की दारू ही मनुष्यप्राण्यासाठी सर्वाधिक घातक आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी दारूबंदी विषयक विचार मांडले होते. त्यांच्या विविध भजन, अभंग ओव्यामधून हा दारूबंदीचा विचार व्यक्त होतांना दिसतो. राष्ट्रसंताचा हा विचार सर्वसामान्य लोकापर्यंत पोहचावा या उद्देशाने श्री गुरूदेव प्रकाशन, गुरूकुंज आश्रय, जि. अमरावती यांनी दारूबंदी नावाची गद्य–पद्यात्मक पुस्तिका प्रकाशित केली आहे. या पुस्तिकेला बाबा आढाव याची प्रस्तावणा आहे. एकूण ६४ पृष्ठांच्या या पुस्तीकेत राष्ट्रसंतानी आपल्या साहित्यात विविध ठिकाणी मांडलेल्या दारूबंदीविषयक मराठी व हिंदी भाषेतील गद्य व पद्य रचनांचा समावेश केला आहे. प्रस्तुत पुस्तिकेच्या आधारे राष्ट्रसंताचे दारूबंदी विषयक विचार मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

 Copyright © 2020 Authors

ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-6 No. 16 June 2020

राष्ट्रसंत त्यांच्या ग्रामगीता ग्रंथाच्या संसर्ग प्रभाव नामक सहाव्या अध्यायात म्हणतात.

मजुर कष्टाने पैसा मिळवितो । तोहि दारूपायी उधळती ।
मुलाबाळा उपवास पडती । होय दुर्गति जीवनाची ।।८४।।
दारू पिऊनि मारिती स्त्रीला । सगळया गावीच चळ सुटला ।
पूर आला भांडाभांडीला । कोर्ट कचेऱ्या गजबजल्या ।।८५।। (४)

दारूच्या व्यसनाचे गावावर कोणते दुष्परिणाम होतात. हे सांगतांना राष्ट्रसंत म्हणतात, मजूराने मजूरी करून पैसा मिळवावा आणि तो दारूपिण्यात गमवावा आणि यापैशाच्या अभावामुळे मुलाबाळांना उपवास पडून त्यांची दुर्गती व्हावी असेचित्र मला गावात दिसत आहे. हे केवळ एवढयावरच थांबत नाही तर दारू पिऊन आपल्या पत्नीला मारहान करणारे गावात दहशत माजवून गावकऱ्यांना घाबरविणारे दारूबाजही होतेच. त्यामुळे गावात परस्पर कलहाचा जणू पूरच आलेला असायचा आणि पुढे ही प्रकरणे कोर्ट कचेऱ्या पर्यंत जायची याला कारण केवळ मद्यपान असायचे.

या दारूच्या व्यसनावर एकदा गांधी जयंतीच्या प्रसंगी बोलतांना महाराज म्हणाले होते. "गांधीजी के सपने का जो स्वराज्य था उसकी पहली शर्त थी, नषीली चिजो की रोकथामा शराब बन्दी के लिऐ उन्होने क्या क्या कष्ट नही उठाऐ' (५) लेकीन आजकी हमारी सरकार शराब के शैतान का जूट देने के पक्ष मे है, फिर भी गांधीजीका उत्सव मना रही है।" या ठीकाणी गांधीजयंती उत्साह साजरे करणारे सरकार प्रत्यक्षात मात्र गांधीजीच्या विचारांना तिलांजली कशी देते हे महाराजाने दाखवून दिले आहे.

ही दारूबंदी सरकार लागू करत नाही कारण त्यापासून मोठया प्रमाणावर कर प्राप्त होतो. व या कराच्या उत्पन्नावरच सरकार चालते असा सरकारचा युक्तीवाद असतो यावर राष्ट्रसंत म्हणतात, "शराब खुला करने से शासन को बडा आर्थिक लाभ होता है। लोग खुश रहते है। नही तो व छुपे छिपे पिते ही थे। इसपर मै कहुंगा लोग चोरी – व्यभिचार आदि भी करते ही है। इसकेलिए इजाजत क्यो न दि जाये? लोग और भी खुश होंगे। चोरी –व्यभिचार आदि का अड्डे चलाने से सरकार को और भी अर्थ लाभ होंगा क्या इस लिऐ शासन बैठा है" (६)

अशा कठोर शब्दात महाराजांनी सरकारला फटकारल होते.
आपल्या एका भजनात –
ये व्यसनो की आदत ही तो खराब है।
उससे अति खराब ये शराब है। (७)

आपल्या एका मराठी स्वमंत हे म्हणतात.
कस चळल दारू मन हरपल भान,
पर्वा नाही उरली देहाची।
लाज खोविली प्रतिष्ठेची।
जगी नाही किंमत कवडीची।
कुत्र्यापरि मति झाली ज्याची रे जी जी।।
वडिलांचे हात जे धन, बसला गमावून
हाती नाही पैसा खर्चायला।


Copyright © 2020 Authors

ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-6 No. 16 June 2020

तोडतीमुलबाळ त्याला।
कर्ज करूनिया घरी बसला।
भिकारी दारोदरी झाला रे, जी जी ।।(८)

दारूने मन चळले म्हणजे मनुष्याचा विवेक नष्ट झाला देहभान नाहीसे झाले. मान–प्रतिष्ठा नष्ट झाली. कुर्त्यासारखी मानसाची स्थिती केली या दारूने शरीर व मनाचा तोल तर गेलाच सांबतच वडिलांपर्जित धनसंपदाही नष्ट झाली पैसा राहीला नाही त्यामुळे घरखर्च पर्ण करने शक्य झाले नाही. पण कर्जबाजारी होऊन घर बसला.आणि शेवटी भिकारडेपण वाटयाला आले.

अशाप्रकारे दारूचे व्यसन मनुश्याचा शारिरीक, मानसिक व आर्थिंक अद्यःपात कसा घडवून आणते याचे चित्रणच राष्ट्रसंतानी समोर ठेवलेले आपणास दिसून येते.

वाहवा रे दारूची नशा, आलि अवदशा।
हुशारी गेली कंगाल जाहला देश गुलामी आली।।धृ।।
धनवान कीती बलवान । कुलवान थोर आणि साना।
बुध्दीवान, किती गुणवान । उद्योगी मजूर किसान।।
दारूच्या पायि गांजिल । भिके लागले मान्यत नुरली।
त्या परकीयांनी अशी दुर्दशा केली ।।१।। (६)

या दारूमुळे मनुष्याला अवदशा प्राप्त झाली आहे. हुशारी जाऊन देश कंगाल झाला आहे. देशाला गुलामी आली. आहे. कित्यंक धनवान, कुलवान, थोर आणि लहान एवढेच नव्हे तर बुध्दीवान, गुणवान, उद्योगी मजुर आणि किसान दारू पायी गांजलेले आहेत. असे दारूचे दुष्परिणाम महाराजांनी वर्णन केले आहे. हे सर्व सांगून लोकजागृती ¼10½ करणे हा महाराजांचा प्रधान हेतू होता.

राष्ट्रसंताचे सर्वच साहित्य हे लोकमानसाच्या रंजनासाठी नव्हे तर प्रबोधनासाठी होते. हे दिसून येते. सर्वसामान्य मानसांच्या उत्पादनासाठी राष्ट्रसंतानी रचना केल्या त्यामागे समाजातील वाईट विचारांचा नायनाट व्हावा व चांगल्या विचारांचा उदय व्हावा हा समाजाभिमुख्य हेतू होता.

**राष्ट्रसंताच्या मते दारूचे दुष्परिणाम –**

१) दारूमुळे शरीराची हानी होऊन शरीर विविध रोगांचे आश्रय स्थान बनते.

२) दारूमुळे पैशाची नासाडी होते. परिणामी गरीब शेवटपर्यंत गरीबीतच राहतो. कर्जबाजारीपणा त्याच्या पिच्छा सोडत नाही.

३) दारूपिणाऱ्याला सामाजीक सन्मान किंवा प्रतिष्ठा कदापिही प्राप्त होने शक्य नसते.

४) दारू पिणाऱ्या व्यक्ती बरोबर त्यांच्या कुटुंबालाही आर्थिक व सामाजिक दुष्परिणामाला समोरी जावे लागत.

५) दारूही मनुष्याचा विवेक नष्ट करून अनेक वाईट विचारांना जन्म देते. त्यामुळे मद्यपी व तो त्या समाजात राहतो त्यांचे शांततामय जीवनच धोक्यात येते.

**दारूबंदीसाठी उपाययोजना –**

महाराजांच्या मते दारूबंदीसाठी पुढील उपाय योजना हव्यात –

१) दारूबंदीसाठी प्रथम शासकीय पातळीवरून प्रयत्न व्हायला हवेत.

 Copyright © 2020 Authors

२) प्रत्येक व्यक्तीने आपला विवेक जागृत ठेवल्यास कुणीही दारूच पिणार नाही.

३) धर्मपरायण व सदाचार संपन्न जीवन हे व्यसनापासून व्यक्तीला दूर ठेवत असत.

४) सर्वोदयाचे कार्य, समाज शिक्षण या सारखे उपक्रम दारूपासून व्यक्तीला दूर ठेवतात.

५) दारूच्या दुष्परिणांची जानीव मोठया प्रमाणात कथन दिल्यास दारूंबदी सामाजीक पुढाकाराने होऊ शकते.

**संदर्भ ग्रंथ**

१) दारूबंदी– प्रकाशक मो. र. पुनसे श्रीगुरूदेव प्रकाशन गुरूकुंज आश्रम जि. अमरावती पृ. ६०

२) तत्रैव– पृ. ६२

३) तत्रैव– पृ. ६३

४) ग्रामगीता– राष्ट्रसंत महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तकनिर्मीती व अभ्यायक्रम संशोधन मंडळ पुणे दृ ४ पुनर्मुद्रणे २००३ अध्याय ६

५) दारूबंदी – प्रकाशक मो. र. पुनसे श्रीगुरूदेव प्रकाशन गुरूकुंज आश्रम जि. अमरावती पृ. १३

६) तत्रैव– पृ. १५

७) तत्रैव– पृ. २२

८) तत्रैव– पृ. २२

९) तत्रैव– पृ. ३८

10) तत्रैव– पृ. 73

 **Copyright © 2020 Authors**